**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात विविध पक्षांच्या उमेदवारांकडून शक्तिप्रदर्शन करीत विधानपरिषद निवडणुकीसाठी अर्ज दाखल
- राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाची ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर
- केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीची ६ हजार कोटींहून अधिक रुपये किमतीच्या २ रेल्वे प्रकल्पांना मंजुरी
- बंगालच्या उपसागरात तयार झालेलं दाना चक्रिवादळ आज मध्यरात्री ओडिशा किनारपट्टीवरच्या धडकण्याची शक्यता

**आणि**

- पुणे कसोटीत पहिल्याच दिवशी न्यूझीलंडचा संघ २५९ धावात गारद/ दिवसअखेर भारताच्या १ बाद १६ धावा

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. विविध पक्षांनी उमेदवार याद्या जाहीर केल्या असून, काही उमेदवारांनी अर्ज भरायला सुरुवात केली आहे.

**महाविकास** आघाडीच्या वतीने **इंदापूर** विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. **येवल्यामधून** राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ, **आंबेगावमधून** दिलीप वळसे पाटील, **शिर्डी** इथून भाजपचे राधाकृष्ण विखे पाटील,

**कोथरूड**मधून चंद्रकांत पाटील यांनी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या जयंत पाटील यांनी सांगलीच्या **इस्लामपूर** मतदारसंघातून तर काँग्रेच्या यशोमती ठाकूर यांनी अमरावती जिल्ह्यातल्या **तिवसा** मतदारसंघातून आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**मुंबईत** मलबार हिल इथून भाजपचे मंगलप्रभात लोढा यांनी अर्ज दाखल केला तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी वरळी मतदार संघातून अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाची विधानसभा निवडणुकीसाठी पहिली उमेदवार यादी आज जाहीर झाली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पुणे इथे वार्ताहर परिषदेत ४५ उमेदवारांची नावे जाहीर केली. बारामतीमधून युगेंद्र पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इस्लामपूरमधून जयंत पाटील, तासगाव कवठे महांकाळ इथून रोहित पाटील निवडणूक लढवणार आहेत. घनसावंगीतून राजेश टोपे, काटोलमधून अनिल देशमुख, कोरेगावमधून शशिकांत शिंदे यांची नावं उमेदवार यादीत आहेत. मुंब्रा मतदारसंघातून जितेंद्र आव्हाड यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. तर रोहित पवार यांना कर्जत जामखेडमधून उमेदवारी देण्यात आली आहेत.

अहेरीत भाग्यश्री आत्राम यांच्या विरुद्ध त्यांचे वडील धर्मराव बाबा आत्राम उभे असल्यानं राज्यात पहिल्यांदाच वडील - मुलगी यांच्यात लढत पहायला मिळेल.

**<><><><><>**

राजस्थान आणि उत्तर प्रदेश विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. राजस्थानमधल्या चौरासी विधानसभा मतदारसंघासाठी तर उत्तर प्रदेशमध्ये कुंदरकी, गाझियाबाद, खैर, करहल, फुलपूर, कटेहरी आणि मझवा या मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या **मुंबई पूर्व उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीनं ६ हजार ७९८ कोटी रुपये किमतीच्या २ रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली. नरकटियागंज ते दरभंगा, सितामढी-मुझफ्फरपूर तसंच एरुपलेम-नामबुरू या दरम्यान हे रेल्वे मार्ग आहेत. यामुळं अयोध्या ते सीतामढी, काठमांडू, जनकपूर आणि लुंबिनी रेल्वे मार्गाशी जोडले जाणार आहेत. तसंच आंध्र प्रदेशाची राजधानी अमरावतीही रेल्वेशी जोडली जाईल.

येत्या ५ वर्षात अवकाश क्षेत्रासाठी १ हजार कोटी रुपयांच्या व्हेंचर कॅपिटल फंडालाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. याअंतर्गत वर्षाला सरासरी दीडशे ते अडीचशे कोटी रुपये दिले जातील.

<><><><><>

दिवाळी आणि छठ पूजेनिमित्त रेल्वे ७ हजार विशेष गाड्या चालवणार आहबे. गेल्यावर्षीच्या साडे चार हजार गाड्यांच्या तुलनेत ही मोठी वाढ असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि चीन मध्ये राजनैतिक आणि लष्करी पातळीवरच्या वाटाघाटी सुरु असून प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळच्या काही भागाबद्दल असलेले मतभेद मिटवण्यात त्यांचा उपयोग होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज आयोजित झालेल्या ‘चाणक्य संवाद २०२४’ या कार्यक्रमात ते आज बोलत होते. नियंत्रण रेषेजवळ लष्कराची गस्त आणि गुरांची चराई सुरु राहणं याबाबत दोन्ही देशांचं एकमत झाल्याचं त्यांनी सांगितलं.

देशाच्या विकासात तंत्रज्ञानविषयक सुधारणांबरोबरच सुरक्षा राखण्याचं भारताचं उद्दिष्ट असून शस्त्रास्त्रांचं तसेच इतर सुरक्षा उपकरणांचं उत्पादन स्वदेशात करण्यासाठी भारताच्या सुरु असलेल्या प्रयत्नाचे दूरगामी आणि सकारात्मक परिणाम होतील असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नुकत्याच मंजूर झालेल्या बायो ई थ्री अर्थात ‘अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगार यांच्यासाठी जैवविविधता’ या धोरणामुळे देशाची अर्थव्यवस्था आणि पर्यावरण रक्षण उपक्रमावर सकारात्मक परिणाम होईल, असं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान

राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. जैवविविधता उत्पादनाला चालना देणं हा या धोरणाचा हेतू असल्याचं ते यावेळी म्हणाले. भारत-जर्मनी विज्ञान तंत्रज्ञान सहकार्याच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते. या सरकारच्या काळात विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती झाली असून देशानं अंतराळ मोहिमात चांगली कामगिरी केल्याचं जितेंद्र सिंह यांनी यावेळी सांगितलं. विज्ञान आणि तंत्रज्ञान हे जगाचे आधारस्तंभ आहेत, असंही ते म्हणाले.

<><><><>

सेबीच्या अध्यक्ष माधबी पुरी बुच आज संसदेच्या सार्वजनिक लेखा समितीसमोर हजर राहू न शकल्यामुळे समितीची बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. अशा काही नियामक मंडळाच्या कारभाराची चौकशी करण्याचा निर्णय समितीने आता स्वतःहून घेतला असल्याचं सार्वजनिक लेखा समितीचे अध्यक्ष के सी वेणुगोपाल यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांना सांगितलं.

यावर महालेखापाल अर्थात कॅग च्या अहवालावर चर्चा करणं हे समितीचं काम असताना वेणुगोपाल यांनी नियामक मंडळांच्या कामकाजाची स्वतःहून दखल घेण्याची गरज नव्ह्ती असं भारतीय जनता पक्षाचे नेते रवी शंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ तारखेला मन की बात या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग आहे. श्रोते येत्या २५ तारखेपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

<><><><><>

बंगालच्या उपसागरात तयार झालेलं दाना चक्रिवादळ आज मध्यरात्री ओडिशा किनारपट्टीवरच्या भितरकनिका आणि धामरा या प्रदेशांदरम्यान धडकण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दानाच्या भूभागावरचा वेग ताशी १०० ते १२० किलोमीटर असून उद्या पहाटेपर्यंत त्याचा प्रभाव राहील. सध्या हे चक्रीवादळ ओडिशाच्या किनारपट्टीपासून २४० किलोमीटर अंतरावर असून ते ताशी १२ किलोमीटर वेगाने पुढे जात आहे. या वादळामुळे ओडिशातील केंद्रपारा, बालासोर, मयूरभंज, जगतसिंगपूर आणि भद्रक या जिल्ह्यांत जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

<><><><><>

इराकमध्ये अन्बर प्रांतात झालेल्या लष्करी कारवाईत इस्लामिक स्टेटचे ९ दहशतवादी मारले गेले. यावेळी मोठ्या प्रमाणात शस्त्र आणि दारुगोळा जमा करण्यात आला.

<><><><><>

जर्मनी विरुद्धची हॉकी मालिका भारतानं आज गमावली. नवी दिल्लीत मेजर ध्यानचंद स्टेडियमवर झालेल्या दुसऱा सामन्यात भारतानं ५-३ असा विजय मिळवला. कालचा सामना भारतानं गमावल्यानं दोन्ही देश १-१ अशा बरोबरीत होते. त्यामुळं मालिकेचा विजेता ठरवण्यासाठी पेनल्टी शूटआऊट घेण्यात आलं. त्यात भारतीय खेळाडूंना केवळ १ गोल करता आला, जर्मनीनं ३ गोल केले.

<><><><><>

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या आजच्या पहिल्या दिवसअखेर भारतानं १ बाद १६ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा लवकर बाद झाला. शुभमन गिल १० आणि यशस्वी जयस्वाल ६ धावांवर खेळत होते. त्यापूर्वी न्यूझीलंडच्या संघाने सर्वबाद २५९ धावा केल्या. न्यूझीलंडकडून डेव्हन कॉनवेने ७६ तर रचिन रवींद्रने ६५ धावांची खेळी केली. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने ५ तर रविचंद्रन अश्विनने ३ गडी बाद केले. तीन सामन्यांच्या मालिकेत न्यूझीलंडनं बंगळुरू इथला पहिला कसोटी सामना जिंकला आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन सामन्याच्या मालिकेतला पहिला एकदिवसीय सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत सर्वबाद २२७ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ३८ व्या षटकात ७ बाद १५८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

जपान आणि भारत एकमेकांचे स्वाभाविक भागीदार असून दोन्ही देशांचे संबंध आज सर्वोच्च पातळीवर असल्याचं जपानचे वाणिज्यदूत यागी कोजी यांनी म्हटलं आहे. मुंबईत राजभवनात आज त्यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेतली त्यावेळी ते

बोलत होते. जपानचे महाराष्ट्राशी विशेष चांगले संबंध असून महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासोबत कौशल्य प्रशिक्षणासाठी जपान सहकार्य करीत आहे असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्यापासून दोन दिवसांसाठी छत्तीसगडच्या दौऱ्यावर जात आहेत. रायपूर इथल्या अखिल भारतीय वैद्यकीय संस्थेच्या दुसऱ्या दीक्षांत समारंभात आणि राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या चौदाव्या दीक्षांत समारंभात त्या उद्या उपस्थित राहतील. नया रायपूर इथल्या पुरखौती मुक्तांगणलाही त्या भेट देणार आहेत.